# माझा मराठीची बोलू कौतुके.........

- मराठी भाषेचा उदय संस्कृतच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेच्या ‘महाराष्ट्री’ या बोलीभाषेपासून झाला.
- पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला.
- मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे.
- ‘महाराष्ट्र’शब्दाचा पहिला उल्लेख इ.स.५०० च्या दरम्यान ‘महावंश’ या ग्रंथात आढळतो.
- देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली.
- आज मराठी ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते.मध्ययुगात मराठी मोडी लिपीत लिहिली जात असे.
- मराठीचे व्याकरण संस्कृताधारित आहे. मराठीत तत्सम,तद्भव, आणि परभाषीय शब्द आहेत.
- मराठी लिखिताची आद्यरूपे ताम्रपट,कोरीव शिलालेख, कागदपत्रे अशा रूपांत दिसून येतात. राजा केसिदेवरायच्या कारकिर्दीत कोरलेला अक्षी शिलालेख हा आजवर सापडलेला मराठी भाषेतील पुराणतम शिलालेख आहे.कर्नाटकातील ‘श्रवणबेळगोळ’ येथील गोमटेश्वर मूर्तीच्या पायथ्याशी कोरलेला ‘श्री चामुंडराये करवियेले’ हा मराठी शिलालेख इसवी सनाच्या दहाव्या शतकातील (इ.स.९८३) आहे.
- मराठी भाषेचे वय हे साधारणपणे १५०० वर्ष मानले जाते.
- इसवी सनापूर्वी २०७ या वर्षी ब्राह्मी लिपीत परंतु महाराष्ट्री भाषेत लिहिलेले शिलालेख सापडले आहेत.
- महाराष्ट्र शासनाच्या ‘अभिजीत भाषा समिती’ अहवालानुसार ‘गाथा सप्तशती’ हा ७०० श्लोकांचा मराठी ग्रंथ इसवी सनाच्या पहिल्या शतकात लिहिला गेला. त्याचा अर्थ असा की ही भाषा त्या लिखाणाअगोदर किमान ३०० वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. ग्रंथातील वर्णन आजही मराठी लोकांच्या आचार-विचारांशी आणि त्यांच्या सध्याच्या संस्कृतीशी जुळणारे आहे. ग्रंथात वापरलेले गेलेले काही शब्द मराठीखेरीज अन्य भारतीय भाषेत नाहीत.

- भांडारकर पुरातत्व संशोधन संस्थेमध्ये मराठी भाषेचे प्राचीनत्व सिद्ध करणारी किमान ८० हस्तलिखिते उपलब्ध आहेत.
- मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे.
- मराठीच्या अनेक बोली प्रचलित असून,त्यात प्रामुख्याने मालवणी, वऱ्हाडी, खानदेशीचा समावेश होतो.नव्या संशोधनाच्या आधारे मराठी बोलींची संख्या पन्नासच्या घरात जाते.
- मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे.
- २०११ च्या जनगणनेनुसार, भारत देशात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे १० कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तृतीय क्रमांकाची  भाषा आहे.
- मराठी भाषा भारतासह,फिजी,मॉरिशस व इस्रायल या देशांतही बोलली जाते.
- महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत मराठीच्या उच्च शिक्षणाची सोय आहे. महाराष्ट्राबाहेरील एकूण १५ विद्यापीठांमध्ये मराठी शिकविली जाते.
- कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.
- मराठीत दरवर्षी दोन हजार नवीन पुस्तके प्रकाशित होतात व सुमारे ५०० दिवाळी अंक प्रसिद्ध होतात.
- भारतातील सर्वाधिक खपाचे मासिक ’लोकराज्य’ हे मराठी भाषेतच प्रकाशित होते.
- मराठी पुस्तकांची एकत्रित बाजारपेठेतील वार्षिक उलाढाल सुमारे २५० कोटींची आहे.देशभरातील एकूण ग्रंथालयातील २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत.
- कोशवाङ्मयाच्या संख्येच्या बाबतीत मराठी भाषेचा जगात दुसरा क्रमांक लागतो.’मराठी विश्वकोश’ हा भारतीय भाषांतील सर्वश्रेष्ठ कोश म्हणून गणला जातो.
- मराठी साहित्याचा प्रारंभ इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकापासून झालेला दिसतो.
- मराठी आद्यग्रंथ म्हणून ज्योतिषरत्नमाला(अकरावे शतक), विवेकसिंधु (इ.स.११८८), लीळाचरित्र(इ.स.१२७८) या ग्रंथांची चर्चा इतिहासात आढळते.

- महानुभाव साहित्य, संत साहित्य, पंडिती काव्य, शाहिरी काव्य इत्यादी प्राचीन साहित्यातून आधुनिक मराठी साहित्य विकसित झाले आहे.
- मराठी प्राचीन काव्यात भक्तिकाव्य आणि भक्ती आंदोलने यांची मोठी भूमिका दिसून येते.
- महात्मा फुले,डॉ.आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांचे कार्य आणि लेखनाची दीर्घ परंपरा यांचे फलित म्हणजे साठोत्तरी मराठी दलित, ग्रामीण, स्त्री-साहित्य होय.
- वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर आणि भालचंद्र नेमाडे अशा चार मराठी साहित्यिकांना आजवर ज्ञानपीठ पुरस्कार मिळाले आहेत.
- भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी पुरस्कार' शिवाजी सावंत यांना ‘मृत्युंजय’ या कादंबरीसाठी मिळाला आहे.
- विजय तेंडुलकर,महेश एलकुंचवार आणि शरणकुमार लिंबाळे या लेखकांना 'सरस्वती सन्मान' मिळाले आहेत.
- संगणकीय क्षेत्रात मराठी संकेतस्थळे, मराठी भाषिक संसाधने विकसित होत असून, मराठी ज्ञानभाषा बनते आहे.
- सर्वोत्तम चित्रपटाचे पहिले राष्ट्रपती सुवर्णकमळ आचार्य अत्रे यांच्या ‘श्यामची आई’ चित्रपटास मिळाले होते.आजपर्यंत ‘श्यामची आई’, ‘श्वास’, ‘देऊळ’, ‘कोर्ट’, ‘कासव’ अशा एकूण पाच मराठी चित्रपटांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सुवर्णकमळ पुरस्कार मिळालेला आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धोंडो केशव कर्वे, महामहोपाध्याय पां.वा. काणे, भीमसेन जोशी, जे.आर.डी. टाटा, सचिन तेंडुलकर, विनोबा भावे, लता मंगेशकर आणि नानाजी देशमुख हे आजवरचे भारतरत्न पुरस्कार मिळविणारे महाराष्ट्रीय आहेत.

**संकलन**

**मराठी विभाग**

मराठी मराठी

